# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल**

**बोर्ड क्र. ०१ ते २९ (एकुण २९ अपिल)**

**द्वितीय अपील क्रमांक :-**
**१३४,१३५,४८६६,४८६७,६८०५,६८०६,७६०७,७६०८,७६०९,५४९३,५४९४,६३०७,६३०८,६१०५,६१०६,६१०७,६१०८,६०२५,५७७६,५७६३,५७६४,५७६५,४९६७,४९६८,२५९४,२५९५,२५९६,३८७३,३८७४/२०२२**

श्री. सतिश रामगीर गोसावी, :- अपिलार्थी
रा. ११४, स्वामी समर्थ नगर, कोरीट रोड, नंदुरबार,
ता. जि. नंदुरबार-४२५४१२.

१. जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, (बोर्ड क्र. ०१ व ०२) :- उत्तरवादी क्र. १
उप विभागीय अभियंता सार्वजनिक बांधकाम उप विभाग, क्र. १,
नंदुरबार यांचे कार्यालय, नंदुरबार, ता. जि. नंदुरबार.
२. जन माहिती अधिकारी तथा प्रथम लिपीक, (बोर्ड क्र. ०३ व ०४)
कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग,
नंदुरबार यांचे कार्यालय, नंदुरबार,
ता. जि. नंदुरबार-४२५४१२.
३. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, (बोर्ड क्र. ०५ व ०६),
जिल्हा परिषद बांधकाम उप विभाग,
पंचायत समिती कार्यालय, साक्री, ता. साक्री, जि. धुळे
४. जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, (बोर्ड क्र. ०७),
उप विभागीय अभियंता सार्वजनिक बांधकाम उप विभाग क्र. २,
धडगांव यांचे कार्यालय, धडगांव, ता. धडगांव, जि. नंदुरबार.
५. जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, (बोर्ड क्र. ०८ ते ०९),
सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) उप विभाग, तळोदा,
ता. तळोदा, जि. नंदुरबार.
६. जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प अभियंता, (बोर्ड क्र. १० व ११),
बांधकाम विभाग, जिल्हा परिषद कार्यालय, नंदुरबार,
नवीन प्रशासकीय इमारत, १ ला मजला, टोकरतलाव रोड, नंदुरबार,
ता. जि. नंदुरबार-४२५४१२.
७. जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, (बोर्ड क्र. १२ व १३),
वन परिक्षेत्र अधिकारी कोंडाईबारी (प्रा.) यांचे कार्यालय,
कोंडाईबारी, ता. साक्री, जि. धुळे-४२४३०४.
८. जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी, (बोर्ड क्र. १४ ते १५),
तालुका कृषी अधिकारी यांचे कार्यालय, अक्कलकुवा,
ता. अक्कलकुवा, जि. नंदुरबार.
९. जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, (बोर्ड क्र. १६ ते १७),
वन परिक्षेत्र अधिकारी नवापुर (प्रादेशिक) यांचे कार्यालय, नवापुर,
ता. नवापुर, जि. नंदुरबार.

१०. जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, (बोर्ड क्र. १८),
उप विभागीय अभियंता सार्वजनिक बांधकाम उप विभाग,
दोंडाईचा यांचे कार्यालय, दोंडाईचा, ता. शिंदखेडा, जि. धुळे.

११. जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी, (बोर्ड क्र. १९ ते २०),
तालुका कृषी अधिकारी यांचे कार्यालय, नंदुरबार,
ता. जि. नंदुरबार-४२५४१२.

१२. जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी, (बोर्ड क्र. २१ ते २२),
तालुका कृषी अधिकारी यांचे कार्यालय, धडगांव,
ता. धडगांव, जि. नंदुरबार.

१३. जन माहिती अधिकारी तथा निविदा/अर्थ लिपीक, (बोर्ड क्र. २३ ते २४),
सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभाग,
बांधकाम भवन, जुने सिव्हिल हॉस्पिटल समोर,
साक्री रोड, धुळे, ता. जि. धुळे-४२४००१.

१४. जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल, (बोर्ड क्र. २५ ते २६),
वनक्षेत्रपाल (रोहयो), यांचे कार्यालय, "वनभवन"
तहसिल कार्यालय, जवळ, मिशन हायस्कुल समोर,
तळोदा रोड, नंदुरबार, ता. जि. नंदुरबार-४२५४१२.

१५. जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, (बोर्ड क्र. २७),
वनपरिक्षेत्र अधिकारी, नंदुरबार (प्रादेशिक) यांचे कार्यालय,
पंचायत समिती कार्यालयासमोर, नंदुरबार,
ता. जि. नंदुरबार-४२५४१२.

१६. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, (बोर्ड क्र २८),
जिल्हा परिषद बांधकाम उप विभाग,
पंचायत समिती कार्यालय, नंदुरबार,
ता. जि. नंदुरबार-४२५४१२.

१७. जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प अभियंता, (बोर्ड क्र. २९),
बांधकाम विभाग, जिल्हा परिषद कार्यालय, नंदुरबार,
नवीन प्रशासकीय इमारत, १ ला मजला, टोकरतलाव रोड, नंदुरबार,
ता. जि. नंदुरबार-४२५४१२.

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, (बोर्ड क्र. ०१ ते ०२) :- उत्तरवादी क्र. २

१. उप विभागीय अभियंता सार्वजनिक बांधकाम उप विभाग, क्र. १,
नंदुरबार यांचे कार्यालय, नंदुरबार,
ता. जि. नंदुरबार-४२५४१२.

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता (बोर्ड क्र. ०३ ते ०४)
सार्वजनिक बांधकाम विभाग,
नंदुरबार यांचे कार्यालय, नंदुरबार,
ता. जि. नंदुरबार-४२५४१२.

३. प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, (बोर्ड क्र. ०५ ते ०६),
पंचायत समिती कार्यालय, साक्री,
ता. साक्री, जि. धुळे.

४. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, (बोर्ड क्र. ०७),
उप विभागीय अभियंता सार्वजनिक बांधकाम उप विभाग क्र. २,
धडगांव यांचे कार्यालय, धडगांव, ता. धडगांव, जि. नंदुरबार.

५. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप अभियंता, (बोर्ड क्र. ०८ ते ०९),
सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) उप विभाग, तळोदा,
ता. तळोदा, जि. नंदुरबार.

६. प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, (बोर्ड क्र. १० ते ११),
बांधकाम विभाग, जिल्हा परिषद कार्यालय, नंदुरबार,
नवीन प्रशासकीय इमारत, १ ला मजला, टोकरतलाव रोड, नंदुरबार,
ता. जि. नंदुरबार-४२५४१२.

७. प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक, (बोर्ड क्र. १२ ते १३),
सहाय्यक वनसंरक्षक (रोहयो),
धुळे वन विभाग यांचे कार्यालय, डॉ. राममनोहर लोहिया मार्ग,
लेनिन चौक, धुळे, ता. जि. धुळे-४२४००१.

८. प्रथम अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, (बोर्ड क्र. १४ ते १५),
तालुका कृषी अधिकारी यांचे कार्यालय, अक्कलकुवा,
ता. अक्कलकुवा, जि. नंदुरबार.

९. प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक, (बोर्ड क्र. १६ ते १७),
सहाय्यक वन संरक्षक (प्रादेशिक व वन्यजीव),
नंदुरबार यांचे कार्यालय, पंचायत समिती कार्यालयासमोर, नंदुरबार,
ता. जि. नंदुरबार-४२५४१२.

१०. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, (बोर्ड क्र. १८),
उप विभागीय अभियंता सार्वजनिक बांधकाम उप विभाग,
दोंडाईचा यांचे कार्यालय, दोंडाईचा,
ता. शिंदखेडा, जि. धुळे.

११. प्रथम अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, (बोर्ड क्र. १९ ते २०),
तालुका कृषी अधिकारी यांचे कार्यालय, नंदुरबार,
ता. जि. नंदुरबार-४२५४१२.

१२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, (बोर्ड क्र. २१ ते २२),
तालुका कृषी अधिकारी यांचे कार्यालय, धडगांव,
ता. धडगांव, जि. नंदुरबार.

१३. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, (बोर्ड क्र. २३ ते २४),
सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभाग,
बांधकाम भवन, जुने सिव्हिल हॉस्पिटल समोर,
साक्री रोड, धुळे, ता. जि. धुळे-४२४००१.

१४. प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक, (बोर्ड क्र. २५ ते २७),
सहाय्यक वनसंरक्षक (प्रादेशिक व वन्यजीव),
नंदुरबार यांचे कार्यालय, पंचायत समिती कार्यालयासमोर, नंदुरबार,
ता . जि. नंदुरबार-४२५४१२.

१५. प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, (बोर्ड क्र. २८ ते २९),
बांधकाम विभाग, जिल्हा परिषद कार्यालय, नंदुरबार,
नवीन प्रशासकीय इमारत, १ ला मजला, टोकरतलाव रोड, नंदुरबार,
ता. जि. नंदुरबार-४२५४१२.

**(सुनावणी दिनांक १२.०५.२०२६)**

अपिलार्थी यांनी दिनांक २७/१२/२०२१ (०२), ०२/०५/२०२२ (०३), ०९/०७/२०२२ (२), ०९/०८/२०२२ (०२), १९/०८/२०२२ (०२), ०१/०९/२०२२ (०४), १२/०९/२०२२ (०२), २८/०९/२०२२ (०१), ०४/१०/२०२२ (०४), १७/१०/२०२२ (०२), ०५/११/२०२२ (०२) व दिनांक ०३/१२/२०२२ (०३) रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये एकोणतीस द्वितीय अपील दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलांची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आलेले आहे. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या एकुण एकोणतीस जोडपत्र, "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| १ | २६/०७/२०२१ | दिनांक ०१ एप्रिल, २०१८ ते दिनांक ३१ मार्च, २०२१ या कालावधीतील ई-निविदा सुचना क्र. ४२ सन २०१९/२०२० (अल्प कालावधी) साठी सार्वजनिक बांधकाम विभाग, नंदुरबार परिसरात कचरा प्रक्रिया सिस्टिम केंद्र उभारणे, ता. जि. नंदुरबार कामाचे एम. बी. झेरॉक्स मिळावे |
| २ | २६/०७/२०२१ | दिनांक ०१ एप्रिल, २०१८ ते दिनांक ३१ मार्च, २०२१ या कालावधीतील ई-निविदा सुचना क्र. ४२ सन २०१९/२०२० (अल्प कालावधी) साठी सार्वजनिक बांधकाम विभाग, नंदुरबार परिसरात कचरा प्रक्रिया सिस्टिम केंद्र उभारणे, ता. जि. नंदुरबार कामाचे देण्यात आलेले देयके मोजमाप पुस्तिकेतील नोंदी झेरॉक्स मिळावे |
| ३ | ०६/०४/२०२२ | दिनांक ०१ जुलै २०२१ ते दिनांक ३१ मार्च, २०२२ या कालावधीतील विभागामार्फत झालेल्या व सुरु असलेल्या कामाचे देण्यात आलेल्या निविदा संदर्भात नोंद केलेली (निविदा नोंदवही) ची झेरॉक्स मिळावे |
| ४ | ०६/०४/२०२२ | दिनांक ०१ जुलै २०२१ ते दिनांक ३१ मार्च, २०२२ या कालावधीतील विभागामार्फत झालेल्या व सुरु असलेल्या कामाचे बिलासंदर्भात नोंद केलेली (देयक नोंदवही) ची झेरॉक्स मिळावे |
| ५ | २५/०५/२०२२ | दिनांक ०१ एप्रिल, २०२१ ते दिनांक ३१ मार्च, २०२२ या कालावधीतील शासनाकडुन प्राप्त झालेले अनुदान सदर अनुदानाची कॅशबुकात घेतलेल्या नोंदी व खर्चाच्या नोंदी सविस्तर माहिती झेरॉक्स मिळावे |
| ६ | २५/०५/२०२२ | दिनांक ०१ एप्रिल, २०२१ ते दिनांक ३१ मार्च, २०२२ या कालावधीतील आपल्या उप विभागामार्फत शाखा अभियंता यांनी केलेल्या कामाची यादी लेखाशिर्षकानिहाय व देखरेख करणाऱ्या शाखा अभियंत्यांच्या नावानुसार माहिती मिळावी. ठेकेदारास देण्यात आलेले वर्क ऑर्डर, काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र, गुण नियंत्रण मंडळाने दिलेले प्रमाणपत्राचे झेरॉक्स मिळावे |
| ७ | ११/०७/२०२२ | दिनांक ०१/०४/२०२० ते दिनांक ३१/०३/२०२२ या कालावधीतील उप विभागामार्फत रस्ते, पुल, इमारतीच्या झालेल्या व सुरु असलेल्या कामाची तसेच दुरुस्ती व देखभालीच्या केलेली कामाची यादी लेखाशिर्षकानिहाय मिळावी, ठेकेदारांना देण्यात आलेली वर्क ऑर्डर, काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र, दक्षता व गुण नियंत्रण मंडळाचे |

| | | |
|---|---|---|
| | | प्रमाणपत्र, तसेच कामाची अभिलेखात नोंद केलेली वही झेरॉक्स मिळावे |
| ८ | २८/०७/२०२२ | दिनांक ०१ एप्रिल, २०२० ते दिनांक ३१ मार्च, २०२२ या कालावधीतील रस्ते, पुल, इमारतीच्या कामाची दुरुस्ती, देखभालीच्या केलेली कामाची यादी लेखाशिर्षकानिहाय मिळावी, दक्षता व गुण नियंत्रण मंडळाचे घेतलेले प्रमाणपत्र, झालेल्या कामाचे छायाचित्र, आलेला निधी खर्च केलेला निधी माहिती मिळावी |
| ९ | २८/०७/२०२२ | दिनांक ०१ एप्रिल, २०२० ते दिनांक ३१ मार्च, २०२२ या कालावधीतील आपल्या उप विभागांतर्गत शासकीय मुला मुलींचे वसतीगृह, इमारत बांधकाम व दुरस्ती, ठक्करबाप्पा वस्ती सुधारणा, सांस्कृतिक भवन बांधकाम व दुरुस्तीच्या कामाचे देण्यात आलेले वर्क ऑर्डर, काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र व देखरेख करणाऱ्या अभियंत्याचे नाव झेरॉक्स मिळावे |
| १० | १४/०३/२०२२ | दिनांक ०१ एप्रिल, २०२० ते दिनांक ३१ डिसेंबर, २०२१ या कालावधीतील विभागामार्फत तालुकानिहाय झालेल्या व सुरु असलेल्या कामाचे बिलासंदर्भात नोंद केलेली देयक नोंदवही (कॅशबुक) ची झेरॉक्स मिळावे |
| ११ | १४/०३/२०२२ | दिनांक ०१ एप्रिल, २०२० ते दिनांक १४ मार्च, २०२२ या कालावधीतील विभागामार्फत तालुकानिहाय झालेल्या व सुरु असलेल्या कामाचे देण्यात आलेल्या निवीदा संदर्भात नोंद केलेली (निविदा नोंदवही) ची झेरॉक्स मिळावे |
| १२ | २३/०५/२०२२ | दिनांक ०१ एप्रिल, २०२१ ते दिनांक ३१ मार्च, २०२२ या कालावधीतील कार्यालयातील वन परिक्षेत्र अधिकारी यांची दैनंदिनी व झालेल्या संपुर्ण कामाची यादी लेखा शिर्षकानिहाय मिळावी. तसेच जड वस्तु संग्रहीत नोंदवही झेरॉक्स मिळावे |
| १३ | २३/०५/२०२२ | दिनांक ०१ एप्रिल, २०२१ ते दिनांक ३१ मार्च, २०२२ या कालावधीतील शासनाकडुन प्राप्त झालेले अनुदान, सदर अनुदानाची कॅशबुकात घतलेल्या नोंदी व खर्चाच्या नोंदी सविस्तर माहिती झेरॉक्स मिळावे |
| १४ | ०६/०६/२०२२ | दिनांक ०१ एप्रिल, २०२१ ते दिनांक ३१ मार्च, २०२२ या कालावधीतील शासनाकडुन प्राप्त झालेले अनुदान, सदर अनुदानाची कॅशबुकात घतलेल्या नोंदी व खर्चाच्या नोंदी सविस्तर माहिती झेरॉक्स मिळावे |
| १५ | ०६/०६/२०२२ | दिनांक ०१ एप्रिल, २०२१ ते दिनांक ३१ मार्च, २०२२ या कालावधीतील मातीनाला, खोल सलग समतलचर, मजगी, नालाखोलीकरण, दगडी नालाबांध, सिमेंट नाला बांधकाम व दुरुस्तीसाठी देण्यात आलेले वर्क ऑर्डर, काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र आलेला निधी, खर्च केलेला निधी सविस्तर माहिती झेरॉक्स मिळावे |
| १६ | २३/०५/२०२२ | दिनांक ०१ एप्रिल, २०२० ते दिनांक ३१ मार्च, २०२२ या कालावधीतील शासनाकडुन प्राप्त झालेले अनुदान, सदर अनुदानाची कॅशबुकात घतलेल्या नोंदी व खर्चाच्या नोंदी सविस्तर माहिती झेरॉक्स मिळावे |
| १७ | २३/०५/२०२२ | दिनांक ०१ एप्रिल, २०२० ते दिनांक ३१ मार्च, २०२२ या कालावधीतील कार्यालयातील वन परिक्षेत्र अधिकारी यांची दैनंदिनी व झालेल्या संपुर्ण कामाची यादी लेखा शिर्षकानिहाय मिळावी. तसेच जड वस्तु संग्रहीत नोंदवही झेरॉक्स मिळावे |
| १८ | ३१/०५/२०२२ | दिनांक ०१/०४/२०२१ ते दिनांक ३१/०३/२०२२ या कालावधीतील शाखा अभियंता, व्ही. डी. रामोळे, शुभम दिलीप राजपूत, हेमंत साहेबराब गोसावी यांच्या देखरेखीत झालेल्या कामाची व दुरुस्तीच्या कामाची यादी लेखाशिर्षकानिहाय मिळावे. ठेकेदारास देण्यात आलेली वर्क ऑर्डर, प्रयोग शाळेतुन घेतलेला चाचणी अहवाल, काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्राचे झेरॉक्स मिळावे |
| १९ | ०४/०५/२०२२ | दिनांक ०१ एप्रिल, २०२१ ते दिनांक ३१ मार्च, २०२२ या कालावधीतील मातीनाला, खोल सलग समतलचर, मजगी, नालाखोलीकरण, दगडी नालाबांध, सिमेंट नाला |

| | | |
|---|---|---|
| | | बांधकाम व दुरुस्तीसाठी देण्यात आलेले वर्क ऑर्डर, काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र आलेला निधी, खर्च केलेला निधी सविस्तर माहिती झेरॉक्स मिळावे |
| २० | ०४/०५/२०२२ | दिनांक ०१ एप्रिल, २०२१ ते दिनांक ३१ मार्च, २०२२ या कालावधीतील शासनाकडुन प्राप्त झालेले अनुदान, सदर अनुदानाची कॅशबुकात घेतलेल्या नोंदी व खर्चाच्या नोंदी सविस्तर माहिती झेरॉक्स मिळावे |
| २१ | ०४/०५/२०२२ | दिनांक ०१ एप्रिल, २०२१ ते दिनांक ३१ मार्च, २०२२ या कालावधीतील शासनाकडुन प्राप्त झालेले अनुदान, सदर अनुदानाची कॅशबुकात घेतलेल्या नोंदी व खर्चाच्या नोंदी सविस्तर माहिती झेरॉक्स मिळावे |
| २२ | ०४/०५/२०२२ | दिनांक ०१ एप्रिल, २०२१ ते दिनांक ३१ मार्च, २०२२ या कालावधीतील मातीनाला, खोल सलग समतलचर, मजगी, नालाखोलीकरण, दगडी नालाबांध, सिमेंट नाला बांधकाम व दुरुस्तीसाठी देण्यात आलेले वर्क ऑर्डर, काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र आलेला निधी, खर्च केलेला निधी सविस्तर माहिती झेरॉक्स मिळावे |
| २३ | ०६/०४/२०२२ | दिनांक ०१ एप्रिल, २०२१ ते दिनांक ३१ मार्च, २०२२ या कालावधीत विभागामार्फत झालेल्या व सुरु असलेल्या कामाचे बिला संदर्भात नोंद केलेली (निविदा नोंदवही) ची झेरॉक्स मिळावे |
| २४ | ०६/०४/२०२२ | दिनांक ०१ एप्रिल, २०२१ ते दिनांक ३१ मार्च, २०२२ या कालावधीत विभागामार्फत झालेल्या व सुरु असलेल्या कामाचे देण्यात आलेल्या निविदा संदर्भात नोंद केलेली (देयक व नोंदवही) ची झेरॉक्स मिळावे |
| २५ | ३१/१२/२०२१ | दिनांक ०१ एप्रिल, २०२० ते दिनांक ३१ डिसेंबर, २०२१ या कालावधीत केलेल्या कामाचे शासनास दरमहा जमा केलेले दस्तऐवज तसेच झालेल्या कामाचे फोटोची सीडी मिळावी व मग्रारोहयो अंतर्गत केलेल्या कामचे रजिस्टर झेरॉक्स मिळावे |
| २६ | ३१/१२/२०२१ | दिनांक ०१ एप्रिल, २०२० ते दिनांक ३१ डिसेंबर, २०२१ या कालावधीत शासनाकडुन प्राप्त झालेले अनुदान, सदर अनुदानाची कॅशबुकात घेतलेल्या नोंदी व खर्चाच्या नोंदी सविस्तर माहिती झेरॉक्स मिळावे |
| २७ | ३१/१२/२०२१ | दिनांक ०१ एप्रिल, २०२० ते दिनांक ३१ डिसेंबर, २०२१ या कालावधीत शासनाकडुन प्राप्त झालेले अनुदान, सदर अनुदानाची कॅशबुकात घेतलेल्या नोंदी व खर्चाच्या नोंदी सविस्तर माहिती झेरॉक्स मिळावे |
| २८ | १०/०२/२०२२ | दिनांक ०१ एप्रिल, २०१९ ते दिनांक ३१ डिसेंबर, २०२१ या कालावधीत उप विभागामार्फत झालेल्या दुरुस्तीच्या कामाची यादी लेखा शिर्षकानिहाय मिळावे. तसेच ठेकेदारास देण्यात आलेली वर्क ऑर्डर, काम पुर्णत्वाचे प्रमाण पत्राचे झेरॉक्स मिळावे |
| २९ | १०/०२/२०२२ | दिनांक ०१ एप्रिल, २०१९ ते दिनांक ३१ डिसेंबर, २०२१ या कालावधीत विभागामार्फत तालुकानिहाय झालेल्या एसएलआर/एसडीआर कामाची यादी लेखाशिर्षकानिहाय मिळावे. तसेच ठेकेदारास देण्यात आलेली वर्क ऑर्डर, काम पुर्णत्वाचे प्रमाणत्राचे झेरॉक्स मिळावे |

२. आज रोजी सुनावणीदरम्यान उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी हे वारंवार माहिती अधिकारा अंतर्गत माहितीचे अर्ज सादर करुन माहितीची मागणी करतात. अपिलार्थी यांच्या मोठया प्रमाणावर अर्ज करण्याच्या सवयीचा कार्यालयीन कामकाजावर विपरित परिणाम होऊन दैनंदिन कार्यालयीन कामकाज पार पाडताना तारेवरची कसरत करावी लागत आहे.

प्रस्तुत प्रकरणांतील अपिलार्थी यांच्या माहिती अर्जांचे अवलोकन केले असता एकाच माहितीच्या अर्जाच्या प्रतीची छायांकित प्रती काढुन त्यात कालावधीत बदल करुन वेगवेगळया कार्यालयांना माहिती अर्जाच्या प्रती सादर करीत असतात. त्यांनी माहिती अर्जान्वये कोणतीही विशिष्ट माहिती मागितलेली नसुन विस्तृत व मोघम स्वरुपाची संकलित

करुन द्यावी लागणारी माहितीची मागणी केलेली आहे. अपिलार्थी यांनी ठराविक माहिती मागितल्यास माहिती मागितल्यास माहिती देणे शक्य होते. माहितीच्या पृष्ठांची संख्या देखील खुप मोठया प्रमाणावर असते. सदर कामकाजात जास्त कालावधी लागत असल्याने दैनंदिन विभागाचे कार्यालयीन कामे करणे शक्य होत नाही. तसेच जन माहिती अधिकारी म्हणुन कर्तव्य पार पाडत असताना क्षेत्रीय कामे करणे देखील क्रमप्राप्त असते. कार्यालयीन व माहिती अधिकाराचे कामकाज करण्यासाठी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ७(९) नुसार सार्वजनिक प्राधिकरणाची साधन सामग्री या कामासाठी प्रमाणाबाहेर वळवावी लागत आहे. म्हणुन अपिलार्थी यांची आजरोजी विचाराधीन असलेली सर्व द्वितीय अपिले निकाली काढण्यात यावीत, अशी विनंती आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलांवर सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे.

तसेच आज रोजीच्या व यापुर्वीच्या आयोगापुढील सुनावणीच्या अनुषंगाने आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, अपिलार्थी हे नियमित माहिती अधिकारांतर्गत माहिती अर्ज, प्रथम अपील अर्ज व द्वितीय अपिले सादर करतात. अपिलार्थी यांनी मागणी केलेली बहुतांश माहिती विस्तृत, व्यापक व मोघम स्वरुपाची आहे. अशी माहिती एकत्रित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार  अधिनियम, २००५ मधील कलम ७(९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे अशा स्वरुपाचे माहिती अर्ज व्यवहार्य ठरत नाहीत. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफलहोत नाही.

३. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ या प्रस्तावनेमध्ये असे नमूद केले आहे की,

"ज्या अर्थी, लोकशाहीमध्ये माहितगार नागरिक समूह आणि माहितीची पारदर्शकता या बाबी ज्या कार्यशिलतेच्या दृष्टीने, तसेच भ्रष्टाचाराला आळा घालण्याच्या व राज्य शासनाने व त्यांचे यंत्रणा यांना प्रजेला जाब देण्यास उत्तरदायी ठरविण्याच्या दृष्टीने अत्यावश्यक आहेत."

आणि ज्या अर्थी प्रत्यक्ष व्यवहारात माहितीच्या प्रकटणामुळे अन्य सार्वजनिक हितसंबंधांना तसेच शासनाचे कामकाज कार्यक्षमरित्या चालणे, मर्यादित राजकोषीय साधनसंपत्तीचा इष्टतम वापर होणे आणि संवेदनक्षम माहितीची गोपनियता राखणे, या बाबींनाही बाधा येण्याची शक्यता आहे.

आणि ज्या अर्थी, लोकशाहीच्या आदर्शाची परमोच्चता कायम राखताना या परस्परविरोधी हितसंबंधांचा मेळ घालणे आवश्यक आहे.

त्या अर्थी, आता माहिती मिळविण्याची इच्छा असणाऱ्या नागरिकांना विवक्षित माहिती पुरविण्याकरिता तरतूद करणे इष्ट होईल. म्हणुन शासकीय कामकाज सुचारु व समोपचाराने चालविणे आणि माहिती अधिकाराचे कामकाजात सुसूत्रता यांचा ताळमेळ घालणे आवश्यक आहे.

४. मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपील ६४५४/२०११, दिनांक ०९.०८.२०११ रोजी Applicants Central Board of Secondary Education & Anr. Vs Adity Bandopadhyay & Ors. Respondents या प्रकरणी खालील आदेश दिले आहेत.

"The Act should be not be allowed to misused or abused or to become a tool to abstract the national development and integration or to destroy the peace, tranquillity and harmony among its citizens. Nor should be converted into a tool of oppression or intimidation of honest officials striving to the to do their duty-Nation does not want a scenarios where ७५% of the staff of public authorities spend ७५% of their time in collecting and furnishing information to applicants instead of discharging their regular duties. The treat of penalities under the RTI Act and pressure of the authorities under the Act should not lead to employees of a public authorities prioritizing information furnishing at the cost of their normal and regular duties"

तसेच शासकीय कामाजावर विपरित परिणाम होतो व अशा प्रकारची माहिती जमा करण्यासाठी शासकीय यंत्रणेचा वेळेचा अपव्यय होतो. त्यानुसार प्रस्तुत कायद्याचा मुख्य उद्देश कामकाजात पारदर्शकता, सामान्य जनतेला/नागरीकांना माहिती मिळावी आणि जनतेने माहिती जाणून घेऊन शासकीय कामकाज कार्यक्षम होणे व त्यात समन्वय प्रस्थापित होणे हा आहे. जर अशा प्रकारे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ या कायद्याचा दुरुपयोग झाल्यास निश्चितपणे शासकीय/अधिकारी यांना मुख्य कार्यालयीन कामकाज सोडुन प्राप्त माहिती अर्जावर अधिनियमाप्रमाणे

कामकाज करावे लागेल. त्यामुळे शासकीय यंत्रणेच्या वेळेचा अपव्यय होऊन त्याचा विपरित परिणाम शासकीय कामकाजावर होईल.

५. मा. उच्च न्यायालय आंध्रपदेश, हैद्राबाद येथील रिट पिटीशन क्र. २०१८२, दिनांक २७.०१.२००९ मध्ये खालील आदेश दिलेले आहेत.

"The Act is an effective device which if utilized judiciously and properly, would help the citizens to become more informed. It no doubt relieves an applicant from obligation to disclose the reason as to why he wants the information. However, indiscriminate efforts to secure information just for the sake of it, and without there being nay useful purpose to serve, would only put enormous pressure on the limited human resources, that are available. Diversion of such resources, for this task would, obviously, be, at the cost of ordinary functioning. Beyond a point, it may even become harassment, for the concerned agencies. Much needs to be done in this direction to impart a sense of responsibility on those, who want to derive benefit under the act to be more practical and realistic."

०६. प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने, मा. सर्वोच्च न्यायालय व मा. केंद्रिय माहिती आयोग आणि राज्य माहिती आयोग यांनी वेळोवेळी पारित केलेले निर्णय विचारात घेता, एकाच व्यक्तीने मोठया संख्येने माहिती अधिकार कायद्याखाली माहिती अर्ज/अपिले करणे माहिती अधिकार कायद्यान्व्यये अभिप्रेत/अपेक्षित नाही. यावरुन अपिलार्थी हे माहिती अधिकार कायद्याचा मोठया प्रमाणावर दुरुपयोग करुन सबंधित शासकीय कार्यालयास/प्राधिकरणास वेठीस धरत असुन त्यांच्या या कृतीमुळे संबंधित शासकीय कार्यालये/प्राधिकरणांचे दैनंदिन कामकाज ठप्प होण्याचा गंभीर धोका निर्माण झाला आहे. अशा मोठया स्वरुपात अर्ज करण्याच्या सवयीमुळे संबंधित शासकीय कार्यालये/प्राधिकरणे यांचा बहुमुल्य वेळ व शक्ती आर्थिक प्रमाणात खर्ची पडुन सदर शासकीय कार्यालयांकडुन सर्व सामान्य जनतेला ज्या सेवा देणे अभिप्रेत आहे त्या महत्वाच्या शासकीय कामकाजावर गंभीर परिणाम होण्याचा धोका देखील निर्माण झाला आहे. अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीतुन कोणतेही व्यापक जनहित साध्य होत असल्याचे स्पष्ट होत नाही. वारंवार मोठया प्रमाणात माहितीचे अर्ज करुन मागणी केलेल्या माहितीच्या मागणीमुळे शासकीय यंत्रणेतील मनुष्यबळ व साधन सामग्री यावर ताण येऊन सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन शासकीय कामे पुर्ण करण्याच्या शासकीय कार्यालयाच्या /प्राधिकरणाच्या क्षमतेवर विपरित परिणाम होऊन शासकीय कामकाजाचा खोळंबा होईल व असे माहिती अधिकार कायद्यास अभिप्रेत नाही, असे आयोगाचे स्पष्ट मत झालेले आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

उपरोक्त २९ द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक.

**जावक क्र.** ६९०० **दिनांक :** ०९/०८/२०२८

निर्गमित केले.
दिनांक ०२/०८/२०२८
सही